जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 FEB 2017
सकाळ

# विद्यापीठात राज्य महिला आयोगातर्फे कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठ व राज्य महिला आयोगातर्फे मंगळवारी (ता. ७) 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण' अधिनियम-२०१३' या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत कार्यशाळा होत आहे, अशी माहिती बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. लोककला केंद्रात सकाळी अकरा ते सायंकाळी पाच या वेळेत कार्यशाळा होईल.

डॉ. मोरे म्हणाले, ''कायद्यांतर्गत महिलांच्या तक्रार निवारणासाठी 'अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती' स्थापन करणे अनिवार्य आहे. त्यानुसार विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांत अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली आहे, मात्र कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जनजागृतीची गरज असल्याचे लक्षात आले आहे. तक्रार निवारण समिती



ही अंमलबजावणी प्रक्रियेतील महत्त्वाची यंत्रणा आहे. या समितीच्या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. कार्यशाळेसाठी विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य व अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीच्या दोन प्रतिनिधी यांना आमंत्रित केले आहे.'' कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अधिकारी प्रा. एन. एस. चव्हाण, लेखाधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव एस. एम. कुबल, पर्यावरण विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत, आनंदा शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 FEB 2017
Times of India

# Varsity focuses on Vishaka guidelines

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The state commission for women will be conducting a workshop on Vishaka guidelines on Tuesday at Shivaji University, Kolhapur.

The workshop has been organised to create awareness about preventions and guidelines made to fight sexual harassment cases. The commission chairman Vijaya Rahatkar, deputy secretary Manjusha Molavane and other officials from the state government too will remain present for the workshop.



HARASSMENT CELL

An SUK official said, "Sexual harassment of women at workplace (Prevention, prohibition, redressal) Act which came into existence in 2013, must be functional at every college and professional enviornment. The colleges affiliated to SUK in Sangli, Satara and Kolhapur districts have already formed the internal complaints committee."

He added, " In order to create awareness at the root level, the committee members need to be informed about the guidelines and laws under such cases. The workshop will help and train the committe members for the future."

A SUK circular which was released recently said, "It is mandatory for a college to form an internal complaint committee and to put the details and the names of the members in the visible area of the college."

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 FEB 2017
तरूण भारत

# विद्यापीठात महिला संरक्षण विषयावर कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

'प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधिनियम-२०१३' या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य महिला आयोग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (७) सकाळी ११ वाजता लोककला केंद्रात कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विशाखा मार्गदर्शक तत्वानुसार कामाच्या ठिकाणी महिलांचा 'लैंगिक छळ संरक्षण' या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालयात महिलांच्या तक्रार निवारणासाठी 'अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती' स्थापन करणे अनिवार्य आहे. त्यानुसार विद्यापीठ व परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा येथील सर्व महाविद्यालयांमध्ये 'अंतर्गत तक्रार समिती' स्थापन करण्यात आलेली आहे. दुसऱ्या सत्रात राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. मंजुषा मोळवणे, सचिव अं. ना. त्रिपाठी, सदस्या विंदा किर्तीकर, दिप रत्नाकर सावंत, विशाल केडिया, आनंदा शिंदे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेचा समारोप सायंकाळी ५ वाजता होणार आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. पी. डी. राऊत, विलास सोयम, एस. एम. कुबल, जिल्हा समन्वयक आनंदा शिंदे आदी उपस्थित होते.

**प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांची माहिती**

5 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात मंगळवारी 'महिला लैंगिक छळ संरक्षण'वर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विशाखा मार्गदर्शक तत्त्वानुसार कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ या कायद्याची अंमलबजावणी व जनजागृती करण्यासाठी राज्य महिला आयोगाच्या वतीने विद्यापीठात मंगळवार (दि.७) रोजी कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचे प्राचार्य व अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीच्या प्रतिनिधींसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठातील लोककला केंद्रात सकाळी ११ ते ५ या वेळेत होणाऱ्या तीन सत्रांत उपसचिव डॉ. मंजुषा मोळवणे, राज्य महिला आयोगाचे सदस्य विशाल केडिया हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी कुलसचिव विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, राज्य महिला आयोगाचे जिल्हा समन्वयक आनंदा शिंदे, प्रा. एन. एस. चव्हाण, प्रा. डॉ. पी. डी. राऊत, उपकुलसचिव एस. एम. कुबल, उपकुलसचिव विलास सोयम, टी.एस.भूतकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 FEB 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात मंगळवारी कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विशाखा मार्गदर्शक तत्त्वानुसार 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण' (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) या कायद्याच्या जनजागृतीसाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी लोककला केंद्र, शिवाजी विद्यापीठात सकाळी ११ ते संध्याकाळी ५ या वेळेत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, उपसचिव डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे, सचिव अं. ना. त्रिपाठी, सदस्या विंदा कीर्तिकर, लेखाधिकारी दीप रत्नाकर सावंत, विशाल केडिया, जिल्हा समन्वयक आनंदा शिंदे हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेसाठी विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य व महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समितीचे दोन प्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात आले आहे, अशी माहितीही मोरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 FEB 2017
तरुण भारत

# विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ २४ फेब्रुवारीला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५२ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवार २४ रोजी होणार आहे. सध्या दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुण्यांचा शोध सुरू असून, येत्या दोन दिवसात प्रमुख पाहुणा कोण असणार हे ठरणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सुत्रांनी दिली. शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी जवळपास ४५ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. शिवाय २६ हजार विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्र पाठवली जाणार आहे. तसेच पीएच.डी. पदवी पैकी फॅकल्टी ऑफ आर्ट ॲन्ड फायनल आर्ट , सोशल सायन्स, विज्ञान विभाग, कॉमर्स विभाग, शिक्षणशास्त्र विभाग, अभियांत्रिकी आदी विभागातील विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र व्यासपीठावर दिली जाणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

5 FEB 2017

तरुण भारत

# विकासासाठी महिलांचा सहभाग अनिवार्य

## प्रा. वंदना सोनाळकर

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्त्रियांवर होणारे अत्याचार अजूनही सुरूच आहेत. शारीरिक व मानसिक पातळीवर होणाऱ्या अत्याचारात वाढ होत असल्याचे एनएसएसच्या सर्वेक्षणानुसार दिसून येते. हे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. देशाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर यामध्ये स्त्रियांच्या सहभाग अनिवार्य आहे, असे मत मुंबईच्या टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस येथील ॲडव्हान्स सेंटर फॉर वुमेन्स स्टडीजच्या प्रा. डॉ. वंदना सोनाळकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागाच्या वतीने यु.जी.सी, सॅप डीआरएस फेज–३ अंतर्गत आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र शुक्रवारी झाले. यावेळी 'भारतातील लैंगिकतेचा प्रश्न, समस्या आणि भवितव्य' या विषयावर त्या बोलत होत्या. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागाच्यावतीने आयोजित चर्चासत्रात बोलताना प्रा. वंदना सोनाळकर. व्यासपीठावर मान्यवर.

प्रा. सोनाळकर म्हणाल्या, भारत हा कृषि प्रधान देश असल्यामुळे स्त्रियांवर जोखीम सर्वाधिक आहे. स्वातंत्र्योतर काळात झालेल्या अनेक आंदोलनामुळे काहीअंशी स्त्रियांच्या परिस्थितीत बदल झाला आहे. समाजसुधारक महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री प्रश्नांसंबंधी केलेल्या कार्यामुळे आज सर्वच क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर असल्याचे दिसून येते. राजकीय क्षेत्रात जरी आरक्षण असले तरी म्हणावा तसा सहभाग जाणवत नाही. डॉ. डी.आर.मोरे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉ. आर. बी. पाटील, डॉ. विजय मारूलकर, प्रा. बी. के. नागला, प्रा. एस. सी. राजोरा, प्रा. श्रीकृष्ण महाजन, प्रा. भारती पाटील उपस्थित होते. डॉ. प्रतिमा पवार यांनी स्वागत केले. विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. प्रतिमा देसाई यांनी आभार मानले.